**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः01.10.2023** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- स्वच्छतेसाठी आज देशभरात “एक तारीख एक तास”.

- चंद्रपूर इथं सुरु असलेलं इतर मागासवर्ग समाजाचं आंदोलन मागे.

- डीडी सह्याद्रीवर उद्यापासून नवीन कार्यक्रमांचा आरंभ.

- आशियाई क्रिडा स्पर्धेत आतापर्यंत 10 सुवर्णपदकांवर भारतीय क्रिडापटूंची मोहोर

आणि

- कोकण किनारपट्टीला सावधानतेचा इशारा.

**मोदी स्वच्छता**

स्वच्छ भारत अभियानाचा भाग म्हणून आज सकाळी 10 वाजल्यापासून सुरु होणाऱ्या श्रमदान या स्वच्छताविषयक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटरद्वारे देशभरातील नागरिकांना केलं आहे. स्वच्छ भारत ही एक सामायिक जबाबदारी आहे आणि त्यासाठी केला जाणारा प्रत्येक प्रयत्न महत्त्वाचा आहे. अधिक स्वच्छ भविष्याकडे वाटचाल करण्यासाठी या उदात्त उपक्रमात सहभागी व्हा असंही मोदी यांनी म्हटलं आहे.स्वच्छतेसाठी “एक तारीख एक तास” या आज आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन राज्याला देशात स्वच्छतेत अव्वल स्थान मिळवून देऊया, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. या अभियानानंतर 15 डिसेंबरपर्यंत मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा

आणि मुख्यमंत्री सक्षम वॉर्ड स्पर्धादेखील यशस्वी करायची असून महाराष्ट्र कचरा मुक्त करूया- स्वच्छ, सुंदर करूया- स्वच्छतेचा जागर करूया, असंही आवाहन शिंदे यांनी केलं आहे.

**गडकिल्ले**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या 350 व्या वर्षानिमित्त राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे आज आणि उद्या राज्यातील गड आणि किल्ल्यांच्या परिसरात आणि किल्ल्यांवर स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

**आकाशवाणी**

आकाशवाणीची समृध्द परंपरा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि आणखी समृध्द करण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन आकाशवाणीच्या प्रधान महासंचालक डॉक्टर वसुधा गुप्ता यांनी काल छत्रपती संभाजीनगरमध्ये केलं. पश्चिम विभागातल्या विविध विभागांच्या प्रमुखांच्या परिषदेत त्या काल बोलत होत्या. सध्या उपलब्ध असलेल्या नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून आकाशवाणीच्या लोकप्रियतेत वाढ करण्याचं आवाहन गुप्ता यांनी यावेळी केलं. यावेळी महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्यातले विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

**केसरकर**

शिक्षण संस्थांनी कौशल्यावर आधारित शिक्षणासाठी योगदान द्यावं असं आवाहन राज्याचे शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री दिपक केसरकर यांनी केलं आहे. ते काल सांगली शिक्षण संस्थेच्या सिटी हायस्कूलच्या भेटीदरम्यान बोलत होते. यासाठी एका वेगळ्या दिशेनं वाटचाल करावी लागेल आणि हीच वाटचाल शिक्षण संस्थानाही सक्षम बनवेल, असा विश्वास केसरकर यांनी यावेळी व्यक्त केला.

**आदिवासी शाळा**

येत्या दोन वर्षात राज्यात आदिवासी भागातील सर्व शाळांचे डिजिटायझेशन करण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांनी दिली आहे. ते काल नंदुरबार जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान कार्यक्रमांत बोलत होते. अभावानं ग्रासलेल्या दुर्गम

भागात शिक्षणाचा प्रभाव निर्माण करून या भागातील माणूस उभा करण्याची क्षमता फक्त शिक्षकांमध्ये असल्याचा विश्वासही गावित यांनी यावेळी व्यक्त केला.

**आंदोलन**

चंद्रपूर इथं गेले 20 दिवस सुरु असलेलं ओबीसी आंदोलन सरकारच्या आश्वासनानंतर काल मागं घेण्यात आलं. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विविध इतर मागास वर्ग संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून संघटनांच्यावतीनं मांडण्यात आलेल्या सर्व मागण्या सरकारनं मान्य केल्या आहेत. राज्य सरकार ओबीसी समाजाच्या विकासासाठी प्राधान्य देईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. काल चंद्रपूर इथं ओबीसी समाजाचे आंदोलन फडणवीस यांच्या उपस्थितीत मागं घेण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते.

**ज्येष्ठ नागरिक दिवस**

राज्यात सर्व ठिकाणी आज जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्यात येत आहे. या निमित्तानं ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध कार्यक्रम तसंच उपक्रम राबविण्यात येत आहेत. ‘पिढ्यानपिढ्या ज्येष्ठ नागरिकांच्या मानवाधिकासाठी देण्यात आलेली आश्वासनांची पूर्तता करणे’ अशी यावर्षीच्या आजच्या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. यासंदर्भात आकाशवाणीशी आपल्या भावना व्यक्त करताना पुण्यातील ज्येष्ठ नागरिक नंदा गोखले म्हणाल्या -------

**दूरदर्शन**

लोकसेवा प्रसारक दूरदर्शन, उद्या अर्थात 2 ऑक्टोबर रोजी आपला एका वन्नावा वर्धापनदिन साजरा करत आहे. या पार्श्वभूमीवर प्रेक्षकांसाठी काही नवे कार्यक्रम दूरदर्शनवर सुरू झाल्याची माहिती डीडी सह्याद्री वाहिनीचे कार्यक्रम प्रमुख संदीप सुद यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्या, लेखिका सई परांजपे यांच्या समृद्ध कला कारकीर्दीचा आढावा घेणारी ‘ कथा सईची ’ ही 26 भागांची मालिकाही आजपासून प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. कोरोनाच्या काळात बंद पडलेले क्रीडांगण आणि सिंधूधारा हे दोन कार्यक्रम नव्या रूपात पुन्हा सुरू करण्यात आले आहेत.

**अनुवाददिन**

"अनुवादातून मानवतेच्या अनेक चेहऱ्यांची ओळख होते" या मध्यवर्ती संकल्पनेसह आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन काल जगभरात साजरा करण्यात आला. अनुवादकांच्या आंतरराष्ट्रीय महासंघाची स्थापना 1953 मध्ये झाली. संयुक्त राष्ट्र महासभेनं 2017 मध्ये 30 सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन म्हणून ठराव संमत केला. आकाशवाणीच्या वृत्त विभागांद्वारे अनुवादाच्या माध्यमातून भारतीय भाषांना अधिकाधिक सजीव ठेवण्याचं काम गेली अनेक वर्षे निरंतर सुरु आहे. यानिमित्त अनुवादाचं महत्व सांगणारा हा वृत्तांत...

**अनुवाद विविध भाषांमध्ये समानता प्रस्थापित करून आणि काही भाषांच्या इतरांवरील वर्चस्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करून लोकशाहीला बळकट करतो. हे सिद्ध करतो की सर्व कल्पना आणि अनुभव सर्व भाषांमध्ये व्यक्त केले जाऊ शकतात आणि त्यांचं वेगळेपण असूनही त्यांची देवाणघेवाण करता येते. अनुवाद करणं म्हणजे "जवळजवळ समान गोष्ट सांगणं". संपूर्ण जग या "जवळजवळ" मध्ये सामावलेलं आहे. अनुवाद करणं म्हणजे दुसर्याबचा, वेगळ्या, अज्ञाताचा सामना करणं. सार्वत्रिक, बहुविध, वैविध्यपूर्ण संस्कृतीत प्रवेश करू इच्छिणार्यांचसाठी ही बहुधा आवश्यक पूर्वअट असते. युद्धानंतर विकसित झालेली यंत्रं अनुवादाच्या मानवी कौशल्यावर कुरघोडी करू शकली नाहीत. डिजिटल साधनांची मर्यादा मानवी मेंदूच्या क्षमतेपुढं तोकडीच राहील यात शंका नाही. याचं कारण भाषा हे केवळ संवादाचं साधन नाही. ती बरंच काही आहे. अनुवाद करणं म्हणजे भाषेमध्ये विचारात न घेतलेल्या गोष्टींवर प्रश्न उपस्थित करणं, एका भाषेतील उतारा दुसऱ्या भाषेत व्यक्त करताना त्यातील समृद्धता, दरी आणि अर्थाचे पदर उघड करणं. म्हणूनच बहुभाषकतेचं चैतन्य टिकवून ठेवणं अत्यावश्यक आहे जेणेकरुन प्रत्येकजण आपापल्या भाषेमध्ये बोलू शकेल, विचार करु शकेल. स्थानिक भाषांच्या आंतरराष्ट्रीय दशकात म्हणजे 2022 ते 2032 दरम्यान नेमकी हीच गोष्ट पणाला लागलेली आहे. अस्तित्व संपण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या अनेक भाषांच्या अवस्थेकडं या दशकामध्ये लक्ष वेधलं जाईल. स्वत्वाचा शोध घेणाऱ्या या युगामध्ये, अनुवाद हा निर्विवाद उपाय आहे. त्याच्या विना आपण केवळ निःशब्दतेच्या प्रातांनी घेरले जाऊ. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**निवड**

सोलापूर इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉक्टर प्रकाश अण्णा महानवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महानवर सध्या मुंबई विद्यापीठाच्या दूर आणि मुक्त अध्ययन संस्थेत वरिष्ठ प्राध्यापक आणि संचालक पदावर कार्यरत आहेत.

**निधन मनोहर सोनवणे**

ज्येष्ठ लेखक मनोहर सोनवणे यांचं काल पहाटे पुण्यात निधन झालं. ते 63 वर्षाचे होते. सोनवणे हे लेखक, कवी, पत्रकार – संपादक अशा विविध भूमिकांमध्ये चार दशकांपासून अधिक काळ कार्यरत होते. पुण्यातील विश्वकर्मा प्रकाशन संस्थेचे ते विद्यमान संपादक होते. 'एक शहर सुनसान', 'सदरा बदललेली माणसं', 'लोकशाही झिंदाबाद' आदी त्यांची ग्रंथसंपदा प्रकाशित झाली आहे. साहित्यिक तसंच संपादकीय कार्याची दखल घेत त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं होतं.

**आशियाई**

चीनमध्ये हांगचौ इथं सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत काल टेनिस मध्ये मिश्र दुहेरी प्रकारात रोहन बोपन्ना आणि ऋतुजा भोसले यांनी सुवर्णपदकाची कमाई केली. स्क्वॉश स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघानं पाकिस्तानच्या संघाचा पराभव केला. या विजयासह भारताने स्पर्धेतला आपलं दहावं सुवर्णपदक जिंकलं. स्पर्धेत अथलेटिक्स क्रीडा प्रकारांमध्ये भारताने एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकलं. दहा हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत कार्तिककुमारनं रौप्यपदक तर गुणविरसिंहनं कास्यपदक जिंकलं. भारताच्या चमकदार कामगिरीमुळे स्पर्धेत 10 सुवर्ण, 14 रौप्य आणि 14 कास्यपदकांसह एकंदर 38 पदकांची कमाई करून भारत पदकतालिकेत सध्या पाचव्या स्थानावर आहे.

**हवामान**

कोकण किनारपट्टी लगत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे समुद्र खवळलेल्या स्थितीत असणार आहे. त्यामुळं सर्वांनाच सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. कोकणसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**